सोलपूर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या सुरक्षेकरिता Baggage Scanning Machine खरेदी करण्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एसयुटी-०७१५/प्र.क्र.३४२(भाग-१)/विशा-४
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुख्य इमारत, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २७ फेब्रुवारी, २०१९

वाचा:- १. पोलीस आयुक्त, सोलापूर यांचे क्र. सुरक्षा/न्यायालय/१०५/२०१९ दिनांक १६.०२.२०१९ चे पत्र.
२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र. पोमसं/२१/७२७२/न्यायालयीन सुरक्षा/३६७/२०१९ दिनांक २६.०२.२०१९ चे पत्र.

प्रस्तावना:-

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.१५६/२०११ मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय येथे तातडीने Baggage Scanning Machine बसविणे आवश्यक आहे. सदर मशीन खरेदी करण्यासाठी अंदाजित रु.१४.५० लक्ष इतकी रक्कम आवश्यक असल्याचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाच्या सुरक्षेसाठी तेथे तातडीने Baggage Scanning Machine बसविण्याकरिता सदर मशीन खरेदी करण्याकरिता व त्यासाठी येणा-या अंदाजित रु.१४,५०,०००/- (रुपये चौदा लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर बाबीवर होणारा खर्च मागणी क्र.बी-१, मुख्य लेखाशिर्ष २०५५ (००) (०१) जिल्हा पोलीस बल ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री (२०५५०१६८) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर मशीन तातडीने खरेदी करावी व ती पोलीस आयुक्त, सोलापूर यांना उपलब्ध करुन द्यावी.

४. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग- दोन, अनुक्रमांक १९, नियम क्र.६९ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या पूर्ण अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र . २०१९०२२७१६०१२७६९२९ असा आहे .हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Hussein Alimiya Mukadam

Digitally signed by Hussein Alimiya Mukadam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6ec81cd542d1ef02798f37eb2f964c23fcdfbd8b40c5378f934679289bc26def, serialNumber=d1391c614871bb6e825b5f9341bd3ae559abf68b1b3e47c8c1d8d13329cdb465, cn=Hussein Alimiya Mukadam
Date: 2019.02.27 17:51:15 +05'30'

(हुसेन अ. मुकादम)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, सोलापूर.
३) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
६) वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन बीयुडी-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती- विशा-४, गृह विभाग.